# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक 1967, मुंबई - 400001
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स 26292102
E-mail :- desk12@dtemaharashtra.gov.in internet :- http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १२/आस्था(२)/२०१९/सेआप्रयो/ २०८
दिनांक :

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर.

**विषय : सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांच्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अनुज्ञेयतेबाबत. प्रोग्रामर पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांची माहिती.**
संदर्भ : शासन वित्त विभाग निर्णय क्र. वेतन १११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा ३, दि.२.३.२०१९

दि. १.१.२०१६ ते सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत सेवांतर्गत प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्याबाबतचे आदेश, निर्गमित होण्याच्या तारखेपर्यंत ज्यांना, शासन निर्णय वित्त विभाग दि. १.४.२०१० नुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा यथास्थिती पहिला वा दुसरा लाभ मंजूर करण्यात आला आहे, अशा कर्मचारी/ अधिकारी यांचे असुधारीत लाभाचे, यापूर्वीचे आदेश रद्द करुन त्यांना तीन लाभाच्या योजनेनुसार सातव्या वेतन आयोगाच्या वेतन मॅट्रीक्सनुसार, पदोन्नतीच्या पदाच्या सातवया वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी, सदर लाभ सुधारीतरित्या मंजूर करण्यात येती, त्याअनुषंगाने असुधारीत लाभाची रक्कम सुधारीत लाभाच्या रकमेशी समायोजीत करुन फरकाची रक्कम संबंधीतांना अनुज्ञेय करण्यात यावी, असे आदेश संदर्भाधीन शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच या तीन लाभाच्या योजनेच्या लाभार्थीस पदोन्नतीच्या पदाकरीता विहीत केलेली अर्हता, जेष्ठता, पात्रता, अर्हता परीक्षा, विभागीय परीक्षा, उत्तीर्ण असणे, गोपनीय अहवालाची प्रतवारी, विभागीय चौकशी व न्यायिक प्रकरण प्रलंबित नसणे, जातीवैधता प्रमाणपत्र उपलब्ध असणे, अशा पदोन्नतीच्या कार्यपध्दतीची विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत पूर्तता करणे आवश्यक आहे, असेही नमूद करण्यात आलेले आहे.

संदर्भाधीन शासन निर्णयातील उपरोक्त नमूद तरतूदीनुसार, या संचालनालयाच्या अधिपत्याखालील वर्ग ३ मधील प्रोग्रामर पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांची, पूर्वीच्या अनुज्ञेय योजनेनुसार १२/२४ वर्षानंतर (दि. ३१.१२.२०१५ पर्यंत तसेच दि. १.१.२०१६ ते दि. ३१.१२.२०१८ पर्यंतच्या कालावधीत) ज्या कर्मचाऱ्यांनी यथास्थिती पहिला व दुसरा लाभ घेतला आहे, त्यांना १०/२०/३० वर्षानंतर अनुज्ञेय ठरणारी तीन लाभाची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याकरीता. तसेच ज्या कर्मचाऱ्यांना दि.१.१.२०१६ नंतर दि. ३१.१२.२०१८ पर्यंतच्या कालावधीत सेवेची १०-२० वर्षे पूर्ण होत आहेत, अशा संबंधीत कर्मचाऱ्यांची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये दि. ३०.४.२०१९ पर्यंत आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करावी. तसेच कार्यासन क्रमांक १२ च्या ई-मेलवर सॉफ्ट कॉपी पाठविण्यात यावी. (पीडीएफ फाईल पाठविण्यात येवू नये.)

(प्रमोद नाईक)
सहसंचालक, तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(अ)/प्रोग्रॅमर/२०१९/ 1797
दिनांक : २९/०४/२०१९ 29 APR 2019

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
४१२, ई, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

प्रत : या कार्यालयाच्या अधिनस्त शासकीय संस्था / कार्यालय प्रमुख,
त्यांना कळविण्यात येते की, मुख्य कार्यालयाच्या संदर्भित पत्रात सूचित केल्यानुसार आपल्या संस्थेतील प्रोग्रॅमर पदावरील ज्या कर्मचाऱ्यांना दिनांक ०१/०१/२०१६ ते दिनांक ३१/१२/२०१८ या कालावधीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा यथास्थिती पहिला व दुसरा लाभ मंजूर केला आहे, अशा कर्मचाऱ्यांची माहिती सदर पत्रासोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये भरुन आजच मुख्य कार्यालयास कार्यासन क्रमांक १२ च्या desk12@dtemaharashtra.gov.in या ई मेल अॅड्रेसवर व या कार्यालयाच्या est.opune@gmail.com या ई मेल अॅड्रेसवर सादर करावी, तसेच माहिती निरंक असल्यास तसेही त्वरित कळविणे. (पीडीएफ फाईल पाठविण्यात येऊ नये.)

प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी रवाना.

पूर्वीच्या अनुज्ञेय योजनेनुसार १२/२४ वर्षांनंतर (दि. ३१.१२.२०१५ पर्यंत तसेच दि. १.१.२०१६ ते दि. ३१.१२.२०१८ पर्यंतच्या कालावधीत) ज्या कर्मचाऱ्यांना यथास्थिती पहिला व दुसरा लाभ घेतला आहे, त्यांना १०/२०/३० वर्षानंतर अनुज्ञेय ठरणारी तीन लाभाची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याकरीता तसेच ज्या कर्मचाऱ्यांना दि.१.१.२०१६ नंतर दि. ३१.१२.२०१८ पर्यंतच्या कालावधीत सेवेची १०-२० वर्षे पूर्ण होत आहेत, अशा प्रोग्रामर पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांची माहिती

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव, पदनाम, सध्याचे कार्यालय/ संस्थेचे नाव | प्रवर्ग (मागास वर्गीय असल्यास जात वैधता प्रमाणपत्र आहे किंवा कसे प्रत जोडण्यात यावी) | प्रथम नियुक्तीचा दि./ पदनाम (नियुक्ती आदेश जोडण्यात यावेत) | प्रथम लाभाचा दि. पदनाम वेतनसंरचना | प्रथम नियुक्ती/ लाभ मिळाल्यापासून १२ वर्षे पूर्ण केल्याचा दि. पदनाम वेतनसंरचना | दि.१.१.२०१६ नंतर दि. ३१.१२.२०१८ पर्यंतच्या कालावधीत सेवेची १०/२० वर्षे पूर्ण केल्याचा दि. पदनाम, वेतनसंरचना | प्रथम नियुक्तीदि./योजनेचा प्रथम लाभ लागू झाल्याचा दि. पदनाम वेतनसंरचना | योजनेचा द्वितीय लाभ लागू झाल्याचा दि. पदनाम, वेतनसंरचना | दि.१.१.२०१६ ते ३१.१२.२०१८ या कालावधीत १०-२० वर्षे सेवा पूर्ण केल्याचा दि., पदनाम, वेतनसंरचना | दि.१.१.२०१६ नंतर दि. ३१.१२.२०१८ पर्यंतच्या कालावधीत सेवेची १०, २०, ३० वर्षे पूर्ण केल्याचा दि. पदनाम, वेतनसंरचना | दि. ३१.३.२०१९ पर्यंतचे गोपनीय अहवाल | विभागीय चौकशी/ न्यायिक प्रकरणे प्रलंबित आहेत किंवा कसे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| | | | | | | | | | | | | | |

कार्यालय/ संस्था प्रमुखांची स्वाक्षरी